International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.5 No.1 Sept– Oct 2017

# पंचवार्षिक योजना आणि लघुउद्योग क्षेत्र

**प्रा. संदीप बाबुराव अभंग.**
*व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख,*
*श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय,*
*श्रीगोंदा, जि. अहमदनगर - ४१३७०१*

**गोषवारा:**

*भारतीय लघुउद्योगांना फार मोठी प्राचीन परंपरा आहे. भारतीय संस्कृती जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्यात लघुउद्योगांनी मोलाचे योगदान दिले आहे. ब्रिटीशांचे वसाहतवादी धोरण, इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती, कारखानदारी वस्तूंशी स्पर्धा, मागणीचा अभाव इत्यादी कारणांमुळे ब्रिटीशांच्या राजवटीत भारतीय लघुउद्योगांचा ऱ्हास झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने लघुउद्योगांना पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी नियोजन काळात प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये या क्षेत्राच्या विकासासाठी अनेक नाविन्यपूर्ण योजना व कार्यक्रम राबविले त्यामुळे या क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली. असे असले तरी सध्या या क्षेत्राला अनेक समस्या, प्रश्न आणि अडचणींना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे सरकारने या क्षेत्राच्या विकासासाठी स्वतंत्र, सर्वसमावेशक अशा धोरणाची आखणी आणि अंमलबजावणी करावी परिणामी लघुउद्योग क्षेत्राच्या आणि पर्यायाने देशाच्या औद्योगिक व आर्थिक विकासाला चालना मिळण्यास निश्चितच मदत होईल.*

**कळीचशब्द:** *पंचवार्षिक योजना, लघुउद्योग, औद्योगिक धोरण, गुंतवणूक, औद्योगिक विकास .*

**प्रस्तावना :**

भारतीय लघुउद्योगांना फार मोठी प्राचीन परंपरा आहे. भारतीय संस्कृती जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्यात लघुउद्योगांनी मोलाचे योगदान दिले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी लघुउद्योग क्षेत्राची अवस्था फारशी समाधानकारक नव्हती. ब्रिटीशांच्या भारत विरोधी धोरणामुळे बऱ्याच हस्त आणि लघुउद्योगांचा ऱ्हास झाला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने लघुउद्योगांचे आर्थिक आणि औद्योगिक विकासातील महत्व ओळखून या क्षेत्राच्या विकासाला प्राधान्य दिले. भारताच्या औद्योगिक क्षेत्राचा आकृतीबंध पाहिला तर त्यात उद्योगांची मालकी, व्यवस्थापन,

आकार आणि उत्पादनाच्या स्वरूपावरून उद्योगांचे विविध गटात वर्गीकरण केल्याचे दिसून येते. आकारमानानुसार उद्योगांचे कुटीर उदयोग, अति लघुउद्योग, लघुउद्योग, मध्यम उदयोग व मोठे उदयोग असे प्रकार पडतात. त्यात 'लघुउद्योग' क्षेत्राला भारतात अतिशय महत्वाचे स्थान आहे. भारताच्या एकूण औद्योगिक उत्पादन (४० टक्के), एकूण कारखाने (७६ टक्के), औद्योगिक रोजगार (५२ टक्के), स्थूल देशांतर्गत उत्पादन (८ टक्के) आणि एकूण निर्यातीत (४० टक्के) लघुउद्योग क्षेत्राचे योगदान उल्लेखनीय आहे. याशिवाय ग्रामीण औद्योगिकीकरण, समतोल प्रादेशिक विकास, बेकारी व दारिद्रय निर्मूलन, सामाजिक न्याय आणि भांडवल टंचाईवर मात करण्याच्या दृष्टीनेही लघुउद्योगांकडे पहिले जाते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने जलद आर्थिक विकासासाठी नियोजनाचा स्विकार केला आणि १९५१ पासून पंचवार्षिक योजनांची अंमलबजावणी सुरु केली. पंचवार्षिक योजनांमधील आर्थिक विकास, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, राहणीमानात सुधारणा, रोजगार निर्मिती, दारिद्रय निर्मूलन, ग्रामीण विकास, आर्थिक व सामाजिक विषमता कमी करणे इत्यादी उद्दिष्टये साध्य करण्याच्या दृष्टीने लघुउद्योगांचे महत्व ओळखुन पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून बाराव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत लघुउद्योगांच्या विकासासाठी काय पावले उचललीत? त्यामुळे लघुउद्योगांच्या अडचणी व समस्यांचे निवारण झाले किंवा कसे? याचे विश्लेषण प्रस्तुत लेखात करण्याचा प्रयत्न केला आहे. शोध निबंध लिहण्यासाठी व्दितीय माहिती व आकडेवारीचा आधार घेण्यात आला असून ती शासनाने वेळोवेळी प्रकाशित केलेल्या अहवालातून संकलित केली आहे.

### पंचवार्षिक योजना आणि लघुउद्योग क्षेत्र :

भारत सरकारने १९५१ पासून पंचवार्षिक योजनांच्या अंमलबजावणीस सुरुवात केली. सध्या १२ व्या पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी सुरु आहे. पहिल्या ते बाराव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत सरकारने लघुउद्योगांच्या विकासासाठी कोणत्या उपाययोजना केल्या याची सविस्तर माहिती पुढे दिली आहे.

### १. पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-५२ ते १९५५-५६) :

पहिल्या पंचवार्षिक योजनेत लघुउद्योगांचे आर्थिक विकासातील महत्व मान्य करण्यात आले. तसेच लघुउद्योगांना पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी या योजनेत ४२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. याशिवाय १९५१ मध्ये श्री. जे.सी.कुमारप्पा यांच्या नेतृत्वाखाली एक संघ जपान मधील लघु व कुटीर उद्योगांचा अभ्यास करण्यासाठी पाठविण्यात आला. १९५३ साली भारतीय लघुउद्योग क्षेत्राच्या विकासासाठी आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी काय उपाययोजना करता

येतील याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नियोजन संघाला पाचारण करण्यात आले. १९५५ मध्ये प्रा. डी.जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामोद्योग व लघुउद्योग समिती नेमण्यात आली. लघुउद्योगांच्या विकासासाठी सरकारने १९५४ मध्ये लघुउद्योग विकास संघटना (SIDO) आणि १९५५ मध्ये राष्ट्रीय लघुउद्योग विकास महामंडळाची स्थापना केली[१].

**२. दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-५७ ते १९६०-६१) :**

१९५६ मध्ये दुसरी पंचवार्षिक योजना सुरु करण्यात आली. १९५६ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या नव्या औद्योगिक धोरणाशी सुसंगत अशी औद्योगिक विकासाला चालना देणारी योजना आखण्यात आली. या योजनेत लघुउद्योगांसाठी १८७ कोटी रुपये म्हणजे एकूण योजना खर्चाच्या ४.०० टक्के एवढी तरतूद करण्यात आली. याव्यतिरिक्त लघुउद्योगांच्या विकासासाठी आवश्यक वीज, पाणी, रस्ते आणि विकसित भूखंड असणाऱ्या ६० औद्योगिक वसाहतींची स्थापना करण्यात आली. लघुउद्योगांच्या समस्यांचा अभ्यास करून त्यांच्या विकासासाठी योग्य सूचना देण्याकरिता १९५९ मध्ये पाच सदस्यांच्या जपानी अभ्यासगटाने भारताला भेट दिली. १९६० मध्ये भारतीय लघुउद्योग उत्पादकता संघ चार देशांतील लघुउद्योगांचा अभ्यास करून परत आला.[२]

**३. तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१-६२ ते १९६५-६६) :**

पहिल्या दोन योजनांमुळे औद्योगिक आणि पर्यायाने लघुउद्योगांच्या विकासासाठी पोषक वातावरण तयार झाले होते. म्हणून तिसऱ्या योजनेत लघुउद्योग क्षेत्राच्या विविधीकरणाला आणि विशेषीकरणाला चालना देण्याचे ठरविण्यात आले, त्यासाठी मोठया उद्योगांतून उत्पादित होणारी उत्पादने आणि लघुउद्योगांतील उत्पादने यांचा योग्य मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. एकूण योजना खर्चापैकी (८,७५५ कोटी रुपये) लघुउद्योग क्षेत्रावरील खर्चाचे प्रमाण या योजनेत ३ टक्के म्हणजे २४१ कोटी रुपये एवढे होते. याबरोबरच लघुउद्योगांना आवश्यक कच्चा माल साठविण्यासाठी साठवण गृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले. १९६६ मध्ये लघुउद्योगांची गुंतवणूक मर्यादा ७.५० लाख रुपये तर साह्यभूत उद्योगांतील गुंतवणूक मर्यादा १० लाख रुपये एवढी ठरविण्यात आली.[३]

**४. चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-७० ते १९७३-७४) :**

औद्योगिक मंदी, आर्थिक संकटे, दुष्काळी स्थिती, भारत-पाकिस्तान युद्ध इत्यादी कारणांमुळे चौथी पंचवार्षिक योजना सुरु होण्यास विलंब झाला. चौथ्या योजनेत ग्रामीण, निमशहरी आणि मागास भागात लघुउद्योगांच्या विकासाला प्राधान्य देण्यात आले. मोठया उद्योगांपासून लघुउद्योगांचे संरक्षण व्हावे या दृष्टीने लघुउद्योग क्षेत्रासाठी काही उत्पादने राखून ठेवण्याचे धोरण कायम ठेवण्यात आले. १९७१ मध्ये एच.एस. भट्ट समितीच्या शिफारशीनुसार राज्य पातळीवर लघुउद्योगांच्या

विकासासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याचे ठरविण्यात आले. भट्ट समितीने केलेल्या अनेक शिफारशी १९७३ चे औद्योगिक धोरण तयार करताना स्वीकारण्यात आल्या. यामध्ये सहकारी औद्योगिक वसाहतींची स्थापना, करविषयक सवलती, कच्च्या मालाचा पुरवठा इत्यादींचा समावेश होता. या योजनेत लघुउद्योग क्षेत्रासाठी १५,७७९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.[४]

**५. पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-७५ ते १९७८-७९) :**

स्वयंपूर्णता, औद्योगिक वाढ, सामाजिक न्याय आणि दारिद्रय निर्मूलन या प्रमुख उद्दिष्टांवर आधारित ही योजना होती. दारिद्रय निर्मूलनासाठी या योजनेत लघु आणि कुटीर उद्योगांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. पाचव्या योजनेत लघुउदयोग क्षेत्रासाठी ५९२ कोटी रुपये म्हणजे एकूण योजना खर्चाच्या (३९,४२७ कोटी रुपये) १.५ टक्के एवढी तरतूद करण्यात आली. १९७६ मध्ये सरकारने आजारी लघुउद्योगांचा अभ्यास करण्यासाठी एच.ए.रे यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना केली. मार्च १९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. उदयोग मंत्री जॉर्ज फर्नांडीस यांनी २३ डिसेंबर १९७७ ला नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले. या धोरणानुसार लघुउद्योगांसाठी राखीव असलेल्या वस्तूंची संख्या १८० वरून ५०४ पर्यंत आणि नंतर ८०७ पर्यंत वाढविण्यात आली. लघु आणि कुटीर उद्योगांना आवश्यक असणारी सर्व प्रकारची मदत एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा उदयोग केंद्र स्थापन करण्यात आले. १९७५ मध्ये लघुउद्योग आणि सहाय्यक उद्योगांतील गुंतवणूकीची मर्यादा अनुक्रमे १० लाख रुपये आणि २० लाख रुपये अशी वाढविण्यात आली. याव्यतिरिक्त लघुउद्योगांना वित्त पुरवठा करण्यासाठी आय. डी. बी. आय. बँकेत स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आला.

**६. सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८१ ते १९८४-८५) :**

सहाव्या योजनेत लघुउद्योगांचे आधुनिकीकरण करून त्यांच्या विकासासाठी रचनात्मक धोरणाचा अवलंब करण्यात आला. ग्रामीण भागात कृषी आधारित लघुउद्योगांच्या विकासाला प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबिण्यात आले. २३ जुलै १९८० रोजी सरकारने नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले. या धोरणाने लघुउद्योग क्षेत्रातील गुंतवणूक मर्यादेत बदल करण्यात आला. त्यानुसार अति लघुउद्योगांची गुंतवणूक मर्यादा २ लाख रुपये, लघुउद्योगांतील गुंतवणूक मर्यादा २० लाख रुपये आणि सहाय्यक उद्योगांतील गुंतवणूक मर्यादा २५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली. लघुउद्योग क्षेत्रासाठी आणखी २७ वस्तूंचे उत्पादन राखीव ठेवण्यात आले. लघुउद्योगांच्या विकासासाठी समुह विकास संकल्पनेचा स्विकार करण्यात आला. याशिवाय सार्वजनिक खरेदी धोरण, कच्च्या मालाचा पूरवठा, वीजपूरवठा, अल्पव्याजदरात कर्जपूरवठा इत्यादी योजना पूर्ववत

सुरु ठेवण्यात आल्या. या योजनेत लघुउद्योग क्षेत्रासाठी १,७८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.[५]

**७. सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-८६ ते १९८९-९०) :**

"सामाजिक न्यायासह आर्थिक विकास व उत्पादन क्षमतेत सुधारणा" या प्रमुख उद्दिष्टांवर आधारित सातव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्यात आला. या योजनेत लघु आणि ग्रामीण उद्योगांच्या विकासासाठी एकूण योजना खर्चाच्या (१,८०,००० कोटी रुपये) १.५० टक्के म्हणजे २,७५३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. १९८५ मध्ये पंतप्रधान झाल्यावर राजीव गांधी यांनी नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले. या धोरणाने लघुउद्योगांच्या गुंतवणूक मर्यादेत बदल केले. त्यानुसार लघुउद्योगांची गुंतवणूक मर्यादा २० लाख रुपयांवरून ३५ लाख रुपये तर सहाय्यभूत उद्योगांची गुंतवणूक मर्यादा ३५ लाख रुपयांवरून ४५ लाख रुपये करण्यात आली. लघुउद्योगांची स्पर्धाक्षमता वाढविण्यासाठी राखीव असलेल्या २०० वस्तूंचे आरक्षण रद्द करण्यात आले. लघुउद्योग क्षेत्रातून जास्तीत जास्त निर्यात व्हावी यासाठी आधुनिक तंत्राचा वापर, उत्पादन खर्चात कपात, बाजार सहाय्य, सार्वजनिक खरेदी, वित्तसहाय्य या दृष्टीने उपाययोजना करण्यात आल्या.

**८. आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-९३ ते १९९६-९७) :**

राजकीय अस्थैर्य, वित्तीय असमतोल, चलनवाढ, देशांतर्गत व विदेशी कर्जातील वाढ, पेट्रोलियम पदार्थांच्या वाढत्या किंमती इत्यादी कारणांमुळे १९९०-९१ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक संकटात सापडली. यामुळे १९९० मध्ये आठवी योजना सुरु होऊ शकली नाही. ही योजना १९९२ मध्ये सुरु झाली. लघुउद्योग क्षेत्रासाठी या योजनेत ६,३३४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. नवीन आर्थिक सुधारणा कार्यक्रमाला अनुसरून भारत सरकारने ६ ऑगस्ट १९९१ रोजी लघुउद्योग क्षेत्रासाठी स्वतंत्र धोरण जाहीर केले. या धोरणाने लघुउद्योगांतील गुंतवणूक मर्यादा ३५ लाख रुपयांवरून ६० लाख रुपये, सहाय्यक उद्योगांची गुंतवणूक मर्यादा ७५ लाख रुपये तर अति लहान उद्योगांतील गुंतवणूक मर्यादा २ लाख रुपयांवरून ५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली. लघुउद्योग क्षेत्र परवाना मुक्त करण्यात आले. आधुनिकीकरण आणि तांत्रिक प्रगतीसाठी मोठे उदयोग तसेच विदेशी गुंतवणूकदारांना लघुउद्योगांमध्ये २४ टक्के भांडवल गुंतवणूकीची परवानगी देण्यात आली. लघुउद्योगांच्या वित्तीय समस्या सोडविण्यासाठी १९९१ मध्ये पी. आर. नायक समिती आणि १९९७ मध्ये आबिद हुसेन समितीची स्थापना करण्यात आली. याशिवाय लघुउद्योगांसंबंधी विविध कायदे, नियम, तरतुदींचे पुनर्विलोकन करण्यात आले.[६]

**९. नववी पंचवार्षिक योजना (१९९७-९८ ते २००१-०२) :**

'सामाजिक न्याय आणि समानतेसह आर्थिक विकास' या उद्देशाने १९९७ मध्ये नववी पंचवार्षिक योजना सुरु करण्यात आली. नवव्या योजनेत लघुउद्योग क्षेत्रावर एकूण ४,५०८ कोटी रुपये खर्च करण्यात आले. या योजना काळात सरकारने २००१ मध्ये लघुउद्योग क्षेत्रासाठी एक सर्वसमावेशक धोरण जाहीर केले. प्रादेशिक असंतुलन कमी करण्यासाठी लघु व कुटीर उद्योगांना चालना देण्यात आली. लघुउद्योगात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढावा या उद्देशाने तंत्रज्ञान विकास केंद्रे, आय. एस. ओ. प्रमाणपत्र सुविधा, वस्तूंचा दर्जा व गुणवत्ता तपासण्यासाठी प्रयोगशाळांची स्थापना इत्यादी निर्णय घेण्यात आले. आबिद हुसेन समितीने केलेल्या शिफारशीनुसार लघुउद्योगांसाठी राखीव ठेवलेल्या वस्तूंची संख्या कमी करण्यात आली. तसेच या योजना काळात लघुउद्योग मंत्रालयाकडून लघुउद्योगांची तिसरी देशव्यापी गणना केली गेली. लघुउद्योग आणि सहाय्यक उद्योगांतील भांडवल गुंतवणूकीची मर्यादा ३ कोटी रुपयांवरून १ कोटी रुपयांपर्यंत कमी करण्यात आली. लघुउद्योगांच्या विकासासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी मे १९९९ मध्ये सरकारने एस. पी. गुप्ता अभ्यासगट नियुक्त केला.

**१०. दहावी पंचवार्षिक योजना (२००२-०३ ते २००६-०७) :**

दहाव्या पंचवार्षिक योजनेत लघुउद्योगांना आधुनिकीकरण, पायाभूत सुविधा, तांत्रिक सहाय्य, निर्यात प्रोत्साहन, उद्योजकता विकास, पर्याप्त वित्तपुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी ३,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. या योजनेत लघुउद्योगांच्या वित्तीय समस्यांचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकार आणि रिझर्व्ह बँकेने ए. एस. गुप्ता (२००४) आणि सी. एस. मूर्ती (२००५) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट, अभ्यासगट आणि समित्यांची स्थापना केली. आय. एस. ओ. ९००० आणि १४००१ प्रमाणपत्र सुविधा या योजनेतही सुरु ठेवण्यात आली. लघुउद्योगांना सुलभ वित्तपूरवठा व्हावा यासाठी भारतीय लघुउद्योग विकास बँकेने एप्रिल २००४ पासून 'लघु आणि मध्यम उदयोग' नावाचा निधी सुरु केला. तसेच २००७ मध्ये सुक्ष्म आणि लघुउद्योगांच्या विकासासाठी सर्वसमावेशक पॅकेज जाहीर करण्यात आले. लघुउद्योगांच्या विकासासाठी २००६ मध्ये सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम कायदा संमत करण्यात आला. या कायद्याने लघुउद्योग क्षेत्राची वस्तूनिर्माण क्षेत्रातील लघुउद्योग आणि सेवा क्षेत्रातील लघुउद्योग अशा दोन प्रकारात विभागणी करण्यात आली. या कायद्याने सुक्ष्म, लघु आणि मध्यम असे उद्योगांचे वर्गीकरण करण्यात आले. वस्तूनिर्माण क्षेत्रातील लघुउद्योगांची गुतंवणूक मर्यादा ५ कोटी रुपये व सुक्ष्म उद्योगांतील गुंतवणूक मर्यादा २५ लाख रुपये आणि सेवा क्षेत्रातील लघुउद्योगांतील व सुक्ष्म उद्योगांतील गुंतवणूक मर्यादा अनुक्रमे २ कोटी रुपये आणि १० लाख रुपये अशी करण्यात आली.[७]

**११. अकरावी पंचवार्षिक योजना (२००७-०८ ते २०११-१२) :**

अकरावी पंचवार्षिक योजना १ एप्रिल २००७ पासून सुरु झाली. या योजनेत सुक्ष्म, लघु आणि मध्यम उदयोग क्षेत्रासाठी ११,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. २००७-०८ ते २०११-१२ या काळात लघुउद्योगांतील रोजगार आणि उत्पादन यातील वाढीचा दर अनुक्रमे ४.०० टक्के आणि १५.४० टक्के असा वाढविण्यासाठी लघुउद्योगांना वेळेवर अर्थसहाय्य, तंत्रज्ञान सुविधा, बाजार सहाय्य, कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण, करविषयक सवलती, निर्यात अनुदान, सार्वजनिक खरेदी धोरण इत्यादीच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आले. २०११ मध्ये राष्ट्रीय वस्तूनिर्माण धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणाची उद्दिष्टये गाठण्यासाठी सुक्ष्म, लघु आणि मध्यम उदयोगांचे महत्व मान्य करण्यात आले. लघुउद्योगांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी सरकारने टी.के.ए. नायर (२०१०) यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय कार्यगटाची स्थापना केली. या कार्यगटाच्या अनेक शिफारशी सरकारने स्वीकारल्या. त्यापैकी एक महत्वाची शिफारस स्वीकारून लघुउद्योगांसाठी मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजारात स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करण्यात आले.

**१२. बारावी पंचवार्षिक योजना (२०१२-१३ ते २०१६-१७) :**

स्थूल देशांतर्गत उत्पादनात वस्तूनिर्माण क्षेत्राचे योगदान २५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासाठी सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची भूमिका ओळखून या उद्योगांतील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, संशोधन व विकास, स्पर्धाक्षमतेत वाढ, वित्तसहाय्य इत्यादींसाठी या योजनेत २६,१०४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. लघुउद्योगांचे निर्यातीतील महत्व ओळखून निर्यातप्रधान उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी आर. एस. गुजराल यांच्या अध्यक्षतेखाली २०१३ मध्ये मंत्रीगटाची स्थापना करण्यात आली. याशिवाय लघुउद्योग क्षेत्राच्या विकासासाठी प्रधानमंत्री मुद्रा योजना, स्टार्टअप इंडिया, बाजारविषयक सहाय्य योजना इत्यादींसारखे कार्यक्रम राबविण्यात आले. लघुउद्योगांसाठी लवकरच नवीन धोरण घोषित करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले. २००७-०८ मध्ये अमेरिकेत निर्माण झालेले सब-प्राईम संकट आणि युरोपियन देशांवरील कर्ज संकट यांमुळे भारतीय लघुउद्योग क्षेत्राच्या विकासावर तसेच निर्यातीवर प्रतिकूल परिणाम झाला. यातून मार्ग काढण्यासाठी देण्यात येणाऱ्या उत्पन्न कर, महामंडळ कर, सेवाकर तसेच इतर सवलती पुढील ५ वर्षे सुरु ठेवण्यात येतील असे स्पष्ट करण्यात आले.[८]

पंचवार्षिक योजनांतील लघुउद्योग क्षेत्रावरील खर्च आणि त्याचे औद्योगिक क्षेत्रावरील एकूण खर्च आणि एकूण योजना खर्चातील प्रमाण याची माहिती तक्ता क्रमांक १ मध्ये दिली आहे. त्यावरून १९५१ ते २०१७ या काळात लघुउद्योगांवरील खर्चात ४२ कोटी रुपयांवरून २६,०१४ कोटी रुपयांपर्यंत म्हणजे ६१९.३८ पटींनी वाढ झाल्याचे स्पष्ट होते. एकूण योजना खर्चात आणि एकूण औद्योगिक क्षेत्रावरील खर्चात लघुउद्योगांवरील खर्चाचे शेकडा प्रमाण पहिल्या योजनेत अनुक्रमे २.१

टक्के आणि ४३.३ टक्के एवढे होते. त्यानंतर दुसऱ्या योजनेचा अपवाद वगळता (४.०० टक्के) एकूण योजना खर्चातील आणि एकूण औद्योगिक खर्चातील लघुउद्योगांवरील खर्चाचे शेकडा प्रमाण सतत घटत जाऊन बाराव्या योजनेत अनुक्रमे ०.३ टक्के आणि ६.७ टक्के एवढे कमी झाल्याचे दिसून येते.

**तक्ता क्रमांक १.**

**पंचवार्षिक योजनांतील लघुउद्योग क्षेत्रावरील खर्च**

**(कोटी रुपये)**

| अ.क्र. | योजना | एकूण खर्च | औद्योगिक क्षेत्रावरील खर्च | लघुउद्योग क्षेत्रावरील खर्च | ५ चे ३ शी शेकडा प्रमाण | ५ चे ४ शी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | पहिली पंचवार्षिक योजना (१९५१- ५२ ते १९५५-५६ ) | १,९६० | ९७ | ४२ | २.१ | ४३.३ |
| २. | दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६- ५७ ते १९६०-६१) | ४,६७२ | १,१२५ | १८७ | ४.० | १६.६ |
| ३. | तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१- ६२ ते १९६५-६६) | ८,५७७ | १,९६७ | २४१ | २.८ | १२.२ |
| ४. | तीन वार्षिक योजना (१९६६-६७ ते १९६८-६९) | ६,६२५ | १,६३७ | १२६ | १.९ | ७.७ |
| ५. | चौथी पंचवार्षिक योजना (१९६९- ७० ते १९७३-७४) | १५,७७९ | ३,१०७ | २९३ | १.८ | ९.४ |
| ६. | पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-७५ ते १९७८-७९) | ३९,४२६ | ९,५८१ | ५९२ | १.५ | ६.२ |
| ७. | वार्षिक योजना (१९७९ ते १९८०) | १२,६०१ | २,६३९ | २८९ | २.३ | १०.९ |
| ८. | सहावी पंचवार्षिक योजना (१९८०- ८१ ते १९८४ -८५) | ९७,५०० | १५,०१८ | १,७८० | १.८ | ११.८ |
| ९. | सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-८६ ते १९८९-९०) | १,८०,००० | १९,७०८ | २,७५३ | १.५ | १३.९ |
| १०. | आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-९३ ते १९९६-९७) | ४,३४,१०० | ४६,९२० | ६,३३४ | १.४ | १३.५ |
| ११. | नववी पंचवार्षिक योजना (१९९७-९८ ते २००१-०२) | ८,५९,२०० | ६९,९७२ | ४,५०८ | ०.५ | ६.४ |
| १२. | दहावी पंचवार्षिक योजना (२००२-०३ ते २००६-०७) | ७,६०,३२७ | ५८,९३९ | ३,५०० | ०.५ | ५.९ |
| १३. | अकरावी पंचवार्षिक योजना (२००७-०८ ते २०११-१२) | ३६,७६,९३६ | १,५३,६०० | ११,५०० | ०.३ | ७.५ |
| १४. | बारावी पंचवार्षिक योजना (२०१२-१३ ते २०१६-१७) | ८०,५०,१२३ | ३,७७,३०२ | २६,०१४ | ०.३ | ६.७ |

Source: Puri, V. K. and Misra, S. K. (2013); Indian Economy, Himalaya Publishing House, Mumbai, p. 393, 768 & 822.

**लघुउद्योगांच्या समस्या :**

पंचवार्षिक योजना काळात भारत सरकारने लघुउद्योगांच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे लघुउद्योग क्षेत्राच्या विकासात समाधानकारक वाढ दिसून येत असली तरी वाढीचा हा वेग निर्धारित लक्ष्यांपेक्षा कमी आहे. यास लघुउद्योगांना भेडसावणारे विविध प्रश्न, समस्या व अडचणी कारणीभूत आहेत. यामध्ये कच्च्या मालाचा तुटवडा, त्याचे अवाजवी दर, भांडवलाची कमतरता, आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातील अडचणी, मागणीचा अभाव, भांडवल उभारणीतील अडचणी, व्याजाचे जास्त दर, मोठया उद्योगांशी करावी लागणारी जीवघेणी स्पर्धा, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव, पायाभूत सुविधांचा अभाव, वीज टंचाई व वीजेचे जास्त दर, भ्रष्टाचार, लालफितीचा कारभार, लघुउद्योगांचे आजारपण, लघुउद्योग क्षेत्रावरील खर्चाचे अल्प प्रमाण, संशोधन व विकास यांच्याकडे होणारे दुर्लक्ष, माल विक्रीचे प्रश्न, तणावपूर्ण औद्योगिक संबंध इत्यादी समस्यांचा समावेश होतो. लघुउद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांना विविध स्वरुपाची मदत करण्यासाठी सरकारच्या अनेक योजना आहेत. परंतू त्यांची माहिती व लाभ लघुउद्योजकांपर्यंत पोहचत नाही. त्यामुळे लघु उद्योजक शासनाच्या मदतीपासून वंचित राहतात.

**उपाययोजना :**

लघुउद्योग क्षेत्राच्या विकासाची सद्यस्थिती व त्यांच्या समस्या विचारात घेता या क्षेत्राच्या विकासासाठी सर्वसमावेशक धोरण ठरवून त्याची योग्य अंमलबजावणी करण्याची गरज स्पष्ट होते. लघुउद्योगांना विविध सवलती उदा. कच्चा माल, वीज, विकसित भूखंड, विपणन सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षिण केंद्राची स्थापना इत्यादी उपलब्ध व्हाव्यात यासाठी सरकारने स्वतंत्र निधीची तरतूद करून या क्षेत्रावरील खर्चाचे प्रमाण वाढवावे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी आखलेली धोरणे, कार्यक्रम, कायदे आणि नियम इत्यादींची प्रशासकीय यंत्रणेने काटेकोर अंमलबजावणी करावी. तसेच या विविध योजनांच्या माहितीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात चर्चासत्रे, कार्यशाळा इत्यादींचे आयोजन करावे. संशोधन व विकासाला चालना देण्यासाठी खाजगी क्षेत्राबरोबर सामंजस्य करार करावेत. लघुउद्योग क्षेत्रासंबंधीचे धोरण ठरवितांना जागतिक, स्थानिक आणि आधुनिक प्रणालीचा योग्य समन्वय प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

सध्याच्या स्पर्धात्मक वातावरणात लघुउद्योगांनी देखील अधिक सक्षम होणे गरजेचे आहे. म्हणून लघुउद्योगांनी आपली स्पर्धाशक्ती वाढविण्यासाठी उदयोग व्यवसायाचा विस्तार करणे, आधुनिक तंत्र आत्मसात करणे, वस्तू व सेवांमध्ये विविधता आणणे, उत्पादनाचा दर्जा व गुणवत्ता उच्च प्रतीची ठेवणे यासारख्या मार्गांचा अवलंब करावा. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक

आणि जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांमुळे सरकारला आयातीवर फारसे बंधने घालता येत नाही. त्यामुळे जनतेनेच पुढाकार घेऊन लघुउद्योग क्षेत्रात निर्माण होणाऱ्या स्वदेशी वस्तूंच्या वापराला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

**समारोप :**

भारतीय अर्थव्यवस्थेतील लघुउद्योग क्षेत्राचे महत्व ओळखून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून या क्षेत्राच्या विकासासाठी अनेक योजना आणि कार्यक्रम राबविले. त्यामुळे या क्षेत्राच्या विकासाला गती मिळाली. असे असले तरी भारतीय लघुउद्योग क्षेत्राच्या क्षमतेचा विचार करता हा विकास अपेक्षेपेक्षा कमी आहे. राज्यनिहाय लघुउद्योगांच्या विकासात मोठया प्रमाणात विषमता दिसून येते. शासनाने बरेच प्रयत्न करून देखील लघुउद्योगांच्या समस्यांची, प्रश्नांची तीव्रता कमी झालेली नाही. देशांतर्गत उदयोग, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि इतर विदेशी उद्योगांशी या उद्योगांना सध्या जीवघेणी स्पर्धा करावी लागत आहे, म्हणून भारत सरकारने नवीन आर्थिक धोरण, जागतिक व्यापार संघटनेचे नियम, अटी व करार आणि स्थानिक परिस्थितीचा विचार करून लघुउद्योगांच्या विकासासाठी स्वतंत्र नवीन धोरणाची आखणी व अंमलबजावणी करावी. औद्योगिक धोरणांतर्गतच लघुउद्योगांना देण्यात येणारी प्रोत्साहने, सोयी व सवलती देण्यात येऊ नये. या सर्व गोष्टींचा लघुउद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व घटकांनी विचार करणे आवश्यक आहे असे झाले तर लघुउद्योग क्षेत्राच्या विकासावर व पर्यायाने देशाच्या आर्थिक विकासावर प्रतिकूल परिणाम होणार नाही.

**संदर्भ :**

1. Pooja (2010); Micro, Small and Medium Enterprises (MSMEs) in the Indian Economy: Business Development Strategies, New Century Publications, New Delhi, p. 9.
2. Govt. of India (1956); Second Five Year Plan, Planning Commission, New Delhi, p. 429.
3. Gumma, V. N. (2009); The Impact of Globalization on Small Scale Industries, Regal Publications, New Delhi, p.141.
4. Pooja (2010); op.cit, p.10.
5. Rashid, Abdul and Ahmed, Jaynal Ud-Din (2014); Micro, Small and Medium Enterprise (MSMEs) in India: Institutional Framework Problems and Policies, New Century Publications, New Delhi, p.9-10.
6. Ibid. p.11-12.
7. Puri, V. K. and Misra S. K. (2013); Indian Economy, Himalaya Publishing House, Mumbai, p.812.

8. Govt. of India (2008); Eleventh Five Year Plan 2007-2012, Planning Commission, New Delhi, Volume III, Table No.7.1.15. p. 203 and 206.
9. Govt. of India (2012); Twelth Five Year Plan 2012-2017, Planning Commission, New Delhi, Volume II, Table No. 13.10, p. 85 and 129.
10. खुरुद, भा. श. (२०१३); भारतीय स्वातंत्र्याची पासष्ट वर्षे आणि लघुउद्योग क्षेत्राचा विकास, वाणिज्यविद्या, खंड २, अंक १, पृष्ठ क्र. १०-१२.